**नगर नियोजन व पायाभूत सुविधा क्षेत्रातील अग्रगण्य संस्था**
**'सिडको' महामंडळामध्ये करिअर करण्याची उत्तम संधी**

सिडकोतर्फे सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्याचा तसेच परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी **दि.१९.०१.२०२४ ते दि.२०.०२.२०२४** असून ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

**१. सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | १३ | ७ | ३ | ३ | ४ | २ | २ | १९ | १० | ३८ | १०१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/ समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:- | | | | | | | | | | | |
| १.सर्वसाधारण | ८ | ५ | २ | २ | ३ | १ | १ | १२ | ६ | २५ | ६५ |
| २.महिला-३०% | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ३ | ११ | ३१ |
| ३.खेळाडू-५% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ५ |
| ४.दिव्यांग-४% | एकूण ४ पदे-<br>१. कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यात दुर्बलता<br>२.one Arm/ One leg/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured)/ शारीरिक वाढ खुंटणे(dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack victims)/<br>३.विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/ मानसिक आजार (Mental illness)<br>४. कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यात दुर्बलतासह वरील २ व ३ मधील एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व (Multiple Disabilities) | | | | | | | | | | |
| ५. अनाथ-१% | दि.०६.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-३ नुसार अनाथ प्रवर्गातील पदे भरली जातील. | | | | | | | | | | |

**२. वयोमर्यादा:-**

| अ.क्र. | प्रवर्ग / समांतर आरक्षण | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १. | खुल्या प्रवर्गात मोडणारे उमेदवार | ३८ वर्षे |
| २. | महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांसाठी | ४३ वर्षे |
| ३. | दिव्यांग | ४५ वर्षे |
| ४. | खेळाडू | ४३ वर्षे |
| ५. | माजी सैनिक | ४३ वर्षे |
| ६. | दिव्यांग माजी सैनिक | ४५ वर्षे |
| ७. | अनाथ | ४३ वर्षे |
| ८. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ४३ वर्षे |

- **कमाल वयोमर्यादा दि.१८.०१.२०२४ या दिनांकापर्यंत ग्राहय धरण्यात येईल.**

- **सिडको कर्मचारी व अधिकारी यांना कमाल वयाची अट लागू राहणार नाही.**
- **सिडको कर्मचारी, मागसवर्गीय उमेदवार, दिव्यांग, दिव्यांग माजी सैनिक आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.**

३. **परीक्षेचे स्वरुप**- वर नमूद पदासाठी उमेदवारांची निवड करताना २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार असून सदर परीक्षेकरीता खालीलप्रमाणे अभ्यासक्रम असेल.

| अ.क्र. | परीक्षेचा विषय | एकूण प्रश्न | एकूण गुण | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ३० | ३० | इंग्रजी | १२० मिनिटे |
| २ | सामान्य ज्ञान | ३० | ३० | इंग्रजी व मराठी | |
| ३ | आकलन क्षमता | ३० | ३० | | |
| ४ | व्यावसायिक ज्ञान | ११० | ११० | | |
| | **एकूण** | **२००** | **२००** | | **१२०** मिनिटे |

- **चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा केले जाणार नाहीत.**
- **लेखी परीक्षेमध्ये किमान ९० गुण प्राप्त करणारे उमेदवारच पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरतील.**

४. **परीक्षा शुल्क:-**

| | परीक्षा शुल्क | जीएसटी | एकूण |
|---|---|---|---|
| **राखीव प्रवर्ग** | ९००/- | १६२/- | १०६२/- |
| **खुला प्रवर्ग** | १०००/- | १८०/- | ११८०/- |

५. **सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव खालीलप्रमाणे:-**

| वेतन श्रेणी | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|
| एस-१५,<br>(रु.४१,८००- १,३२,३००/-) | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी<br>२. सॅप इआरपी (टीइआरपी-१०) प्रमाणपत्र | आवश्यक नाही |

६. **निवडीचे निकष-**

१) गुणवत्ता यादीत येण्याकरीता उमेदवाराने ऑनलाईन परीक्षेत एकूण गुणांच्या **किमान ४५%** गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. विहित अर्हता/अटी/शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांची सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे विहित आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

२) उमेदवारांच्या अंतिम निवडीकरीता २०० गुणांची ऑनलाईन परीक्षा तसेच सॅप प्रमाणपत्राचे १० गुण, असे एकूण २१० पैकी गुण गृहित धरले जातील.

३) एकाच पदासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास दि.०२.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

४) उमेदवाराकडे सॅप प्रमाणपत्र नसल्यास रुजू दिनांकापासून १ वर्षाच्या आत सॅप प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील. तथापि, काही उमेदवारांच्या बाबतीत (व्यवस्थापनाने मान्यता दिल्यास) सॅप प्रमाणपत्र सादर करण्याचा कालावधी परिविक्षा कालावधीच्या अंतिम दिनांकापासून ०६ महिन्यापर्यंत वाढवून देण्याची मुभा आहे, सदर वाढीव कालावधीमध्ये उमेदवारांनी सॅप प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

## ७. वरील पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना:-

१) पात्र उमेदवारांनी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाच्या सरळसेवा भरतीसाठी https://ibpsonline.ibps.in/cidcoapr23/ या संकेतस्थळावर **दि.१९.०१.२०२४ पासून दि.२०.०२.२०२४ पर्यंत** ऑनलाईन अर्ज भरावेत.

२) स्पर्धात्मक ऑनलाईन परीक्षा स्थगित वा रद्द करणे, परीक्षेचे स्वरूप, तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या, अनुशेष व आरक्षण यात वाढ किंवा घट करण्याचे अंतिम अधिकार महामंडळास राहतील. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास सामाजिक आरक्षणाच्या त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.

३) भरती प्रक्रिये संदर्भातील तक्रारींवर निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार सिडको व्यवस्थापनाकडे राहील, याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

४) ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड / अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनादेखील परीक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. सदर पदभरतीसाठी निव्वळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्विकारले जातील.

५) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा, शिथीलीकरण इत्यादी पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

६) उमेदवारांची परीक्षा त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार सिडको व्यवस्थापन राखून ठेवीत आहे.

७) इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्ग उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.

८) उमेदवारास ऑनलाईन परीक्षा, कागदपत्र/ प्रमाणपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

९) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या परीक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

१०) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी आल्यास **https://cgrs.ibps.in/** या संकेतस्थळावर आपली तक्रार नोंदवावी किंवा दूरध्वनी क्रमांक 1800 222 366/1800 103 4566 वर अंतिम दिनांकाच्या आधी संपर्क साधावा.

११) परीक्षेचे प्रवेश पत्र वरील संकेतस्थळावरून डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. **प्रवेशपत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.**

१२) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल www.cidco.maharashtra.gov.in संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

१३) भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत आयडी नंबर तसेच पासवर्ड जतन करुन ठेवावा तसेच नोंदणीकृत मोबाईल क्रमांक / ई-मेल संदेश कायम ठेवावा.

## ८. परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना:-

१) परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.

२) परीक्षेचे केंद्र स्थळ / दिनांक/ वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३) कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि/किंवा परीक्षा केंद्र वाढविणे यांचे अधिकार सिडको व्यवस्थापन राखून ठेवत आहे.

४) उमेदवारास नेमून दिलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

५) उमेदवार परीक्षा स्थळावर स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यादरम्यान यासाठी उमेदवारांस कोणतीही दुखापत किंवा नुकसान झाल्यास सिडको व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

६) परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात मोबाईल, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

## ९. सर्वसाधारण अटी:-

१) उमेदवारांनी शासन निर्णय क्रमांक-मातंस२०१२/ प्र.क्र. २७७/३९, दि. ०४.०२.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार संगणकीय प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे.

२) उमेदवारांनी शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक प्रशिक्षण २००० / प्र.क्र.६१ /२००१ / ३९, दि.१९.०३.२००३ मधील तरतूदीनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनाकांपासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

३) उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शालांत परीक्षेशी समकक्ष ठरवलेली परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांस महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून / शासनाकडून अशा परीक्षेची समकक्षता पडताळणी करून घेतल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल.

५) निवड यादीतील उमेदवाराने नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र, **दि.२०.०२.२०२४** या दिनांकास वैध असलेला उन्नत प्रवर्गात (नॉन क्रिमीलेअर) मोडत नसल्याबाबतचा दाखला (आवश्यक त्या प्रवर्गासाठी), तसेच समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी जारी केलेले प्रमाणपत्र, इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती छाननीसाठी नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रांची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल, व तद्नंतरच नियुक्तीस पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६) सदर पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस १ वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी लागू राहील. परिविक्षाधीन कालावधी कोणतेही कारण न देता वाढवण्याचा अधिकार महामंडळास राहील. या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केला नाही किंवा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक नसल्यास अथवा ती व्यक्ती त्या पदावर काम करण्यास योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो / ती सेवा समाप्तीस पात्र राहील.

**७) निवड झालेल्या उमेदवाराने रुजू होते वेळी सेवा बंधपत्र लिहून देणे बंधनकारक आहे.**

**८) नियुक्तीपत्रामध्ये नमूद मुदतीत रुजू होणाऱ्या उमेदवारांची सेवाज्येष्ठता 'सिडको भरती, सेवाज्येष्ठता आणि पदोन्नती नियम १९७७' नुसार राहील. त्यानंतर रुजू होणाऱ्या (व्यवस्थापनाने परवानगी दिल्यास) उमेदवारांची सेवाज्येष्ठता त्यांच्या रुजू दिनांकाप्रमाणे निश्चित करण्यात येईल.**

**१०. महिलांसाठीचे आरक्षण:-**

१) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्रमांक-महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/ कार्या-२, दिनांक-०४ मे २०२३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदाकरीता निवडीसाठी अराखीव तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन – क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

२) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन- क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील

३) महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास अर्जामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन क्रीमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे

४) शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१९१/१७/कार्या-२, दि. १५.१२.२०१७ नुसार जाहिरातीमध्ये अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकापासून उमेदवाराच्या कुटुंबाचे **मागील तीन आर्थिक वर्षाचे सरासरी उत्पन्न नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी ग्राहय धरले जाईल.** उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-creamy layer Certificate), प्रमाणपत्र तपासण्याच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

५) महिला उमेदवारांना परीक्षा शुल्क इत्यादी तरतुदी त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणेच लागू राहतील.

६) महिलांसाठी आरक्षित पदावर दावा करणारी उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

७) मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व संबंधित पद भरतीकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र कागदपत्र पडताळीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८) मागासवर्गीय व्यक्तीशी आंतरजातीय विवाह केलेल्या महिला उमेदवारांना त्यांच्या स्वतःच्या मूळ प्रवर्गानुसार सवलती देय असतील.

**११. मागासवर्गीय महिला:-**

१) अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

२) विमुक्त जाती(अ),भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) इतर मागास प्रवर्ग , विशेष मागासप्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिलांनी त्यांच्या संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाकरीता आवश्यक असलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येईल.

३) मागास प्रवर्गातील महिला उमेदवार अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरल्यास नॉन - क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

४) अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांकडे जात प्रमाणपत्र असल्यास कोणतेही नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

५) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित मागास प्रवर्गाच्या आरक्षणाकरीता आवश्यक असलेले नॉन- क्रिमीलेअर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

६) मागास प्रवर्गातील महिला तिच्या संबंधित प्रवर्गाकरीताचे जात प्रमाणपत्र सादर करु शकत नसल्यास किंवा सादर करू इच्छित नसल्यास, सदर महिलांना अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करावयाचा असल्यास, सदर अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्रमांक-महिआ २०२३/ प्र.क्र.१२३/ कार्या-२, दि. ०४.०५.२०२३ अन्वये नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

७) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहापूर्वीचे नाव अंतर्भूत असलेली क्रिमीलेयरमध्ये मोडत नसल्याबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

**१२. विधवा / घटस्फोटीत / परित्यक्त्या महिला :**

१) विधवा महिलेच्या बाबतीत ती स्वतंत्र राहत असल्यास पतीच्या निधनामुळे प्राप्त झालेले उत्पन्न तसेच तिचे स्वतःचे उत्पन्न ग्राह्य धरून वितरित केलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

२) घटस्फोटीत महिलेच्या बाबतीत तिच्या भूतपूर्व पतीकडून मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मिळणाऱ्या पोटगीची रक्कम व तिचे स्वतःचे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

३) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ अन्वये मा.न्यायालयात केस दाखल झालेली महिला स्वतंत्र राहत असल्यास अशा महिलेचे तिथे स्वतःचे उत्पन्न किंवा अशी महिला नोकरी करीत नसल्यास तिच्या वडिलांचे उत्पन्न नॉन - क्रिमीलेयर प्रमाणपत्राकरीता ग्राह्य धरून वितरित केलेले नॉन - क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

**१३. अनाथ व्यक्तींचे आरक्षण :**

१) अनाथांच्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता उमेदवार महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी (Domicile) असणे आवश्यक आहे.

२) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल.

३) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आई-वडील, काका-काकू, आज्जी-आजोबा, चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

४) आई-वडील हयात नाहीत व जातीचे प्रमाणपत्रही नाही, अशा मुलांना संबंधित जिल्ह्याच्या महिला व बालविकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास विभाग यांच्याकडून अनाथ प्रमाणपत्र प्राप्त उमेदवारांना सदर आरक्षण लागू राहील.

५) अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र./१२२/का-०३, दिनांक-०६.०४.२०२३ व शासन पूरक पत्र दि. १०.०५.२०२३, तसेच यासंदर्भात शासनाकडुन वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

६) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक अनाथ -२०१८/ प्र.क्र. १८२/का-०३,दि.०६.०९.२०२२ तसेच ०६.०४.२०२३, अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणेकडुन वितरित करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

७) अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजु होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बालविकास पुणे यांचेकडुन अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी /विभाग प्रमुख यांची राहील.

८) अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

९) **परीक्षा शुल्क**:- अनाथ उमेदवारांना मागासवर्गीय उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्कामध्ये सूट राहील.

१०) **आवश्यक प्रमाणपत्र:-**

a) **अनाथ प्रमाणपत्र:-** विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांच्याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

b) **वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / अधिवास प्रमाणपत्र:-** सक्षम प्राधिका-याकडून वितरित करण्यात आलेले विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१४. खेळाडूंसाठीचे आरक्षण:**

१) खेळाडूंच्या आरक्षित पदांकरीता उमेदवार हा महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

२) खेळाडू आरक्षणाकरीता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

३) खेळाडू आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे ते ज्या संवर्गासाठी अर्ज करीत आहेत, त्याकरिता विहित दर्जाची आहेत काय तसेच खेळाचा कालावधी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा आहे काय, याची अर्ज सादर करतानाच खातरजमा करुन ती, उमेदवार ज्या विभागातील आहे, त्या विभागातील उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या कडून प्रमाणित करुन घ्यावीत. तरच त्यांना गुणवत्ता धारक पात्र खेळाडू आरक्षणाचा लाभ घेता येईल. राज्य शासनाच्या सेवेत यापूर्वीच असलेल्या उमेदवारांना त्यांनी क्रीडा क्षेत्रात अधिक वरिष्ठ स्थान अथवा पदक प्राप्त केल्यास व ते शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इत्यादी बाबींसह पात्र असल्यास वरिष्ठ जागेसाठी ते अर्ज करण्यास पात्र राहतील.

४) एखादा खेळाडू उमेदवार 'अ' गटातील नेमणुकीसाठी पात्र असून त्याने 'ब' संवर्गातील पदासाठी अर्ज केल्यास त्याचा विचार करण्यात येईल.

५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक- राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे -२०, दि.०१.०७, २०१६ तसेच शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/ क्रीयुसे-२, दि. १८.०८.२०१६, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण-१७१६/प्र.क्र-१८/ क्रियुसे -२, दि.३०.०६.२०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

६) खेळाडू शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२, दि.०१.११.२०१६ नुसार उमेदवार यांनी खालील क्रीडा स्पर्धामधील अर्हता प्राप्त केलेल्या असाव्यात.

| **अ.क्र.** | **स्पर्धा प्रकार** | **पात्रताविषयक अटी** | **खेळविषयक पात्रता** |
|---|---|---|---|
| **भाग-दुसरा** | **गट-ब संवर्गातील पदांकरीता** | | |
| **(एक)** | गट –अ पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू | | |
| **(दोन)** | **अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा (कनिष्ठ गट)**<br>१.ज्यूनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप<br>२.युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>३.कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप | या क्रीडा स्पर्धांना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशिएन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांमध्ये समावेश असलेले खेळ व बुद्धीबळ तसेच कबड्डी, खो-खो व | **(१) वैयक्तिक स्पर्धा-** महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधीत्व करताना/ महाराष्ट्राचे विद्यापीठाचे प्रतिनीधीत्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदाक मिळविणे आवश्यक/ अथवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप | मल्लखांब हे देशी खेळच आरक्षणासाठी पात्र राहतील. | आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक.<br>(२) **सांघिक स्पर्धा-** महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने/ महाराष्ट्राच्या/ विद्यापीठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान/ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदाक मिळविणे आवश्यक/ ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग. |
| | ५.आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुद्धीबळ) | | |
| **(तीन)** | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (वरिष्ठ गट)** | | |
| | १.राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा | | |
| | २.अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) | | |
| **(चार)** | **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा (कनिष्ठ गट)** | | |
| | राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा | | |
| **(पाच)** | राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | | |
| **(सहा)** | राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा | | |
| **(सात)** | अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिडा स्पर्धा | | |
| **(आठ)** | आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा | | |
| **(नऊ)** | **पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा** | | |
| | पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा | | |

**१५. <u>दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण</u>:-**

१) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि.२९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२) दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींकरीता (Person with disability) आरक्षित असलेल्या पदांवरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या दिव्यांग उमेदवारांस (Person with disability) संबंधित वैद्यकिय मंडळाने त्या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्ट्या पात्र ठरविल्यानंतरच प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

३) दिव्यांग व्यक्तीकरीताचे आरक्षण एकूण समांतर आरक्षण आहे. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या सामाजिक प्रवर्गातून करण्यात येईल.

४) दिव्यांगाच्या नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्ती गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येणार नाही.

५) सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगासाठी आरक्षित पदे/पद इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतात.

६) आवश्यक प्रमाणपत्र:

१) **दिव्यांगाचे प्रमाणपत्र**- दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या व्यक्तीने केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावरुन सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

२) **वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र:**-दिव्यांग उमेदवारांना त्यांच्याकरीता असलेल्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणे बंधनकारक आहे. त्याकरीता सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र सादर करणे.

३) **जात प्रमाणपत्र** -दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरीता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन क्रिमीलेअर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७) लेखनिक व अनुग्रह कालावधी :-

१) लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे जारी करण्यात आलेल्या 'लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींची परीक्षा आयोजित करण्याकरीता मार्गदर्शक सूचना २०१८' नुसार तसेच तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२) परीक्षेच्या वेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी महामंडळामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यापूर्वी महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचनां'चे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

**१६. <u>नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र</u>** :

१) आरक्षित पदांवर दावा करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व संबंधित पदभरती करीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

२) नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी खालीलप्रमाणे विचारात घेण्यात येईल:-

a. उमेदवाराच्या कुटुंबाचे मागील तीन आर्थिक वर्षाचे उत्पन्न गृहित धरून वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षासह पुढील तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा अंतिम दिनांक नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

b. मेदवाराच्या कुटुंबाचे मागील दोन आर्थिक वर्षाचे उत्पन्न वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षासह पुढील दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीकरीता वैध राहिल. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा दिनांक नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

c. उमेदवाराच्या कुटुंबाचे एका आर्थिक वर्षाचे उत्पन्न गृहित धरुन वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र वितरित केलेल्या दिनांकाच्या आर्थिक वर्षाकरीता वैध राहील. तथापि, प्रमाणपत्राच्या वैधतेचा दिनांक नमूद असेल तोच ग्राह्य धरण्यात येईल.

**१७.** महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४चा महाराष्ट्र अधि. क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.२९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), आणि भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी, ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे **दि.२०.०२.२०२४** या दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**१८. विविध सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठींच्या आरक्षणसंदर्भातील अटी:-**

१) जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम-२००० मधील तरतुदी आणि यासंदर्भात शासनाकडून वेळोवळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यामध्ये सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) तसेच इतर मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी ते समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नाहीत, असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या वैध प्रमाणपत्राच्या प्रती सादर करणे आवश्यक आहे.

३) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ज्या व्यक्तींच्या नावे जातीचे प्रमाणपत्र असेल ती व्यक्ती व त्या व्यक्तीचे कुटुंब क्रिमी लेअरमध्ये मोडत नसल्याचे व धारकाच्या नावाने सर्वसाधारण रहिवास सदर प्रमाणपत्रात प्रमाणित असणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असलेल्या स्थलांतरित मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

५) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणाऱ्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्गामधील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.

६) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) विशेष मागास प्रवर्ग तसेच इतर मागासवर्ग प्रवर्गाचा दावा करणाऱ्या पात्र माजी सैनिक व प्राविण्यपात्र खेळाडू उमेदवारांना फक्त माजी सैनिक अथवा खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

**१९.खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.)-**

१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राधाओ-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक-३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक दुर्बल घटकातील उमेदवारांच्य प्रमाणपत्रांच्या ग्राह्यता कालावधी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो२०२३/ प्र.क्र.४०/१६-अ, दि.२३ मार्च, २०२३ नुसार समजण्यात येईल.

२) शासन शुद्धीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/ मावक दि. १७ फेब्रुवारी, २०२३ तसेच दिनांक १३ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यातआलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात येईल.

३) राज्याच्या आर्थिक दुर्बल घटकातील ज्या व्यक्तीच्या जातींचा महाराष्ट्र राज्य लोकसेवा ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती , भटक्या जमाती , विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ अन्वये विहित करण्यात आलेल्या मागासवर्गांसाठी अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार घोषित मागास वर्गीयामध्ये समावेश नसेल अशा उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे.

४) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस.)वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे / पुरावा (परिशिष्ट-क) आणि स्वयंघोषणापत्र (परिशिष्ट-ड) पडताळणीच्यावेळी सादर करणे हे आवश्यक राहील.

५) आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि. १३.१०.१९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

६) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेच्या आत (सद्यस्थितीत रु.८ लाख) असणाऱ्या उमेदवारास आर्थिकदृष्ट्या दुर्बल समजण्यात येईल. व सदर आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र असेल.

**टीप**:-

१) प्रस्तुत आरक्षणाच्या प्रयोजनार्थ 'कुटुंब' म्हणजे उमेदवाराचे आई-वडील व १८ वर्षापेक्षा कमी वयाची भावंडे तसेच उमेदवाराची १८ वर्षापेक्षा कमी वयाची मुले व पती/ पत्नी यांचा समावेश होईल.

२) प्रस्तुत आरक्षणाच्या प्रयोजनार्थ 'कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न' यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांचा सर्व स्त्रोतामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असेल. म्हणजेच वेतन, कृषि उत्पन्न, उद्योग-व्यवसाय या व इतर सर्व मार्गातून होणारे व परीक्षेचा अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या मागील आर्थिक वर्षाचे उत्पन्न एकत्रितपणे शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा कमी असावे

७) सदर प्रवर्गातील उमेदवारांकरीता वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

८) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसीलदार यांनी वितरीत केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरीता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरतीकरीता वापरता येणार नाही.

२०. विहित वयोमर्यादेतील शासकीय / निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचा अर्ज त्यांचे विभागातील सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावा. सदर पदाकरीता अर्ज भरण्यासाठी तसेच परीक्षेस बसण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही -२००० / प्र.क्र.१७ / २००० / १२, २८ मार्च २००५ व शासन परीपत्रक एसआरव्ही -२००० / प्र.क्र .१७ / २००० / १२, ०१ जुलै २००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये विहित केल्यानुसार शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना " अ " आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापनाचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे आहे.

२२. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविली असल्याचे आढळल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२३. ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर होईल अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारकआहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

२४. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२५. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी आरक्षित पद उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंबधातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

२६. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना सिडकोच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल.

२७. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याची व शासन निर्णयाच्या अटींची पूर्तता होत असल्याची खात्री झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल. निवड सूचीमधून उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवड सूचीतील प्रतिक्षा यादीवरील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची निवड करण्यात येईल.

२८. वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

२९. तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनाकांपर्यंत या दोन्हीपैकी जे आधीचे पडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.तथापि सदर विधीग्राह्य कालावधी मध्ये बदल करण्याचे अधिकार सिडको व्यवस्थापनाकडे राहतील.

३०. काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३१. मध्यस्थ / ठग / महामंडळाशी संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या सूचना उमेदवारांस देण्यात येत आहेत.

३२. कोणत्याही कारणास्तव सदर जाहिरातीत दर्शविण्यात आलेली पदे अथवा सदरहू जाहिरात रद्द करण्याचा अधिकार सिडको व्यवस्थापन राखून ठेवत आहे. सदर भरतीच्या नियम / निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय / परिपत्रक / विभागाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो. कोणताही किंवा सर्व अर्ज त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सिडको व्यवस्थापन राखून ठेवीत आहे.

**जाहीर** – या प्रक्रीयेशी संबंधित पुढील सर्व घोषणा/ तपशील वेळोवेळी सिडकोच्या www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

**अधिक माहितीसाठी:**

**महाव्यवस्थापक (कार्मिक)**
**दुसरा मजला, कार्मिक विभाग, सिडको भवन**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४**
**फोन- ०२२ ६७९१ ८२४९**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)**

**नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना "अ"**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना "अ"**

मी, श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------------ -- श्री------------------------------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय---------- वर्ष------------राहणार -----------------याद्वारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो / करते की, मी---- ---------------------------- या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

आज रोजी मला------------- (संख्या इतकी हयात मुले / मुली आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ यानंतर मला झालेल्या मुलांची संख्या-----------आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा).

हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : -

दिनांक :

(अर्जदाराची सही)